नाशिकमध्ये राज्यस्तरीय बौद्ध धर्म संमेलन

नाशिक : धम्मकाया मिशनच्या जिल्हा शाखेतर्फे शहरात राज्यस्तरीय 'बौद्ध धर्म संमेलन' आयोजित केले आहे. हे संमेलन २० सप्टेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी एक या वेळेत कॉलेज रोडवरील गुरुदक्षिणा सभागृहात होणार आहे.

संमेलनात मुख्यत्वे महाबोधी महाविहार आणि इतर विहारे मुक्ती आंदोलनासंदर्भात मार्गदर्शन होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून नागपूर विद्यापीठातील पाली भाषा विभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. सुजित बोधी हे बुद्ध धम्माच्या प्रचार प्रसारामध्ये धम्म प्रचारकांची भूमिका, या विषयावर मार्गदर्शन करतील. धम्मकाया मिशनचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रवीण पंडित हे महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनासाठी पाच करोड महाबोधी प्रचारकांची निर्मिती, या विषयावर प्रबोधन करतील. प्रकाश मोरे हे उपासक संघाचे पुनरुज्जीवन करणे या विषयावर मार्गदर्शन करतील. अध्यक्षस्थानी धम्मकाया मिशनचे राज्याध्यक्ष सचिन गायकवाड असतील.

स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकारांविरोधात आंदोलन

प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणण्याची विद्यार्थ्यांची मागणी, जिल्हा प्रशासनाकडे निवेदन

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बुधवारी विद्यार्थ्यांनी आंदोलन केले.

नाशिक : याआधी तीन ते चार वेळा आपण महाराष्ट्र लोकसेवा आयोग अर्थात एमपीएससीची परीक्षा दिली. प्रत्येक वेळी अतिशय कमी फरकाने अपयशी ठरलो. तेव्हा वाटायचे, आपण अधिक अभ्यास केला पाहिजे. परंतु, आता पेपरफुटीमुळे इतर लोक पुढे जात असल्याचे समजल्यावर अपयशाचे मूळ कारण लक्षात येत असल्याची भावना स्पर्धा परीक्षा देणाऱ्या एका विद्यार्थ्याने व्यक्त केली. अभ्यासात कुठेही कमी पडत नसताना सध्याच्या गलथान परिस्थितीमुळे मानसिकतेवर आणि आत्मविश्वासावर अत्यंत वाईट परिणाम होत असल्याचे मत विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. राज्यातील पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर शहरांपाठोपाठ बुधवारी नाशिकमध्ये स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी आंदोलन केले.

१८ कलमी मागण्यांचे निवेदन

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर झालेल्या या आंदोलनात सहभागी एकाने विद्यार्थ्यांमधील अस्वस्थता अधोरेखित केली. महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थी एमपीएससीच्या विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करतात.

या परीक्षांसाठी अनेक वर्षे अथक परिश्रम घेतात. कुटुंबीयांकडून मोठी आर्थिक, सामाजिक व मानसिक गुंतवणूक केली जाते. त्यामुळे एमपीएससीच्या परीक्षा प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा पारदर्शक, निष्पक्ष, सुरक्षित, उत्तरदायी व विश्वासार्ह असणे आवश्यक असल्याकडे आंदोलक विद्यार्थ्यांनी लक्ष वेधले. विद्यार्थ्यांचा ढासळलेला विश्वास कायम ठेवण्यासाठी तातडीने सुधारणा करण्यासाठी १८ कलमी मागण्यांचे निवेदन जिल्हा प्रशासनाकडे सादर करण्यात आले.

स्वतंत्र चौकशी व्हावी

सध्याच्या प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणाची तसेच यापूर्वी झालेल्या संभाव्य परीक्षा गैरप्रकारांची चौकशी पूर्णपणे स्वतंत्र व कोणत्याही दबावापासून मुक्त वातावरणात करण्याची आवश्यकता आहे. निष्पक्षपणे ही चौकशी होण्यासाठी एमपीएससीचे अध्यक्ष व सचिव तसेच या प्रकरणाशी संबंधित मंत्रालयीन अधिकारी यांना चौकशी पूर्ण होईपर्यंत जबाबदाऱ्यांपासून तात्पुरते दूर ठेवावे. प्रश्नपत्रिका निर्मिती, संपादन, छपाई, हाताळणी, वाहतूक, गोपनीय माहितीची सुरक्षा, परीक्षा व्यवस्थेवरील नियंत्रण, प्राप्त तक्रारींवर केलेली कार्यवाही, संभाव्य निष्काळजीपणा किंवा प्रशासकीय त्रुटी यांची स्वतंत्र चौकशीचा आग्रह आंदोलकांनी धरला आहे.

परीक्षेतील प्रत्येक टप्प्यासाठी जबाबदारी निश्चित करावी. प्रश्नपत्रिकेच्या गोपनीयतेसाठी स्वतंत्र व अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणा निर्माण करावी. गोपनीय माहिती बाहेर जाण्याचे मार्ग ओळखून त्यावर नियंत्रण ठेवावे. प्रश्नपत्रिका अभ्यासक्रमाधारित, तथ्यात्मदृष्ट्या अचूक आणि त्रुटीविरहित राहण्यासाठी प्रश्ननिर्मिती ते अंतिम मंजुरीपर्यंत बहुस्तरीय तपासणी करावी, अशी मागणी आंदोलक विद्यार्थ्यांनी केली. क्रीडा, अपंग, टायपिंग व इतर विशेष कोट्यांचे पुनर्विलोकन करावे, अशी मागणी करण्यात आली.

विद्यार्थ्यांकडून अनेक सूचना

- परीक्षा प्रक्रियेतील गैरप्रकार, प्रश्नपत्रिकेतील त्रुटी, परीक्षा केंद्रातील समस्या, तांत्रिक अडचणी अथवा अन्य तक्रारींची दखल घेण्यासाठी स्वतंत्र ऑनलाईन पोर्टल तयार करावे.
- प्रत्येक तक्रार निवारणाची जबाबदारी निश्चित अधिकाऱ्यावर सोपवावी. यावर निश्चित कालमर्यादित कार्यवाही करून विद्यार्थ्यांना उत्तर देणे बंधन करावे.
- आयोगाच्या सदस्य नियुक्तीत पारदर्शकता, परीक्षा गैरप्रकार चौकशीसाठी निश्चित कालमर्यादा, परीक्षा केंद्रातील सुरक्षा व्यवस्था सक्षम करण्याची गरज विद्यार्थ्यांनी मांडली.
- मुलाखतीसाठी स्पष्ट, पूर्वनिश्चित, वस्तूनिष्ठ मूल्यांकन निकष जाहीर करावे, अशा अनेक सूचना विद्यार्थ्यांनी केल्या आहेत.

दावे, हरकती ३० सप्टेंबरपर्यंत दाखल करा

यादीत नाव नसणाऱ्यांना आवाहन, एसआयआर संदर्भात आज आढावा बैठक

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या मतदार यादी सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी व तपासणी करण्यासाठी विभागीय आयुक्त तथा मतदार यादी निरीक्षक डॉ. प्रवीण गेडाम हे गुरुवारी दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेणार आहेत. जिल्ह्यात तब्बल १० लाख २७ हजार ८९४ मतदारांची नावे यादीतून वगळली गेली आहेत. एसआयआर प्रक्रियेवर विरोधकांकडून आधीपासून साशंकता व्यक्त केली जात आहे. प्रारूप यादीत नाव समाविष्ट नसलेल्या पात्र मतदारांनी तसेच दावे व हरकती असलेल्या नागरिकांनी ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत संबंधित मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडे दावे व हरकती दाखल कराव्यात, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

गुरुवारी होणाऱ्या बैठकीस जिल्ह्यातील मंत्री, खासदार, आमदार तसेच राजकीय पक्षांच्या जिल्हाध्यक्षांना आमंत्रित केले आहे. सर्व लोकप्रतिनिधी, राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी केले. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यातील कार्यक्रमानुसार प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली आहे. जिल्ह्यातील १५ विधानसभा मतदारसंघात १० लाखांहून अधिक मतदारांची नावे विविध कारणास्तव वगळली गेली आहेत.

यादीतील नावाची खात्री करा

मतदारांनी आपले नाव मतदार यादीत आहे किंवा नाही, याची खात्री करून घ्यावी तसेच प्रारूप मतदार यादीबाबत नागरिकांना काही आक्षेप किंवा सूचना असल्यास त्यांनी विहित मुदतीत दावे व हरकती दाखल कराव्यात. अधिक माहितीसाठी दुरध्वनी क्रमांक ०२५३-२३१०५२३ या मदतवाहिनीवर संपर्क साधावा, असेही आवाहन जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी प्रसाद यांनी केले आहे.

नांदुरी-सप्तशृंगी घाटात आजपासून वाहतूक बंद

नाशिक : साडेतीन शक्तिपीठांपैकी एक असलेल्या सप्तशृंग गडावरील घाटमार्गात रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने १० ते २६ सप्टेंबर या कालावधीत या मार्गावरील वाहतूक बंद राहणार आहे,

कळवण तालुक्यातील सप्तशृंगी गड-नांदुरी-अभोणा-कनाशी-मानूर-अलियाबाद या रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम केंद्रीय निधी अंतर्गत मंजूर आहे. नांदुरी ते सप्तशृंग गड हा साधारणतः १० किलोमीटरचा घाटमार्ग आहे. केंद्रीय रस्ते विकास निधी अंतर्गत काँक्रिटीकरण, संरक्षक कठडे (भिंत) बांधणी, वळणांवर जुन्या भिंतीचे मजबुतीकरण आदी कामे केली जात आहेत. सप्तशृंगी गड ते नांदुरी रस्त्यावरील घाटमार्गात काँक्रिटीकरणाचे काम करताना वाहतूक वळविण्यासाठी पर्यायी मार्ग उपलब्ध नाही.

रस्ता वाहतूक सुरू असल्यास काम पूर्ण क्षमतेने तसेच विहित वेळेत पूर्ण करणे शक्य होणार नाही. तसेच आगामी कुंभमेळा २०२७ मध्ये भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे काँक्रिटीकरणासाठी सप्तशृंगी गड ते नांदुरी रस्ता या मार्गावरील वाहतूक १० ते २६ सप्टेंबर या कालावधीत बंद ठेवण्याची मागणी सार्वजनिक बांधकाम विभागाने पत्राद्वारे केली होती,

पुन्हा तेच ते ...

गोदावरी प्रदूषित होऊ नये, यासाठी प्रयत्न करण्याची सर्व जबाबदारी जणूकाही प्रशासनाचीच आहे, आपला त्याच्याशी काही संबंध नाही, अशा प्रकारचे वर्तन अनेकांकडून होत असते. टाळकुटेश्वर पुलानजीक गोदापात्रात रिक्षा, टेम्पोसह रुग्णवाहिकादेखील धुतली जात आहे. (छायाचित्र- यतीश भानू)

वडाळा-पाथर्डी रस्त्यावर खड्डा

महापालिका आयुक्तांच्या दर्जेदार कामाच्या दाव्याला धक्का

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांच्याकडून कुंभमेळ्यानिमित्त सुरू असलेली कामे दर्जेदार असल्याचा दावा होत असताना प्रत्यक्षात मात्र स्थिती वेगळी आहे. बुधवारी इंदिरा नगर परिसरातील प्रभाग क्रमांक ३० आणि ३१ मधील वडाळा- पाथर्डी रस्त्यावरील सुदर्शन लॉन्ससमोरील रस्त्यावर खड्डा पडल्याने महापालिकेची धावपळ उडाली.

या रस्त्यावर काही दिवसांपासून काम सुरू आहे. खड्डा पडलेल्या ठिकाणी दोन जलवाहिन्या एकत्र येत असल्याने निदर्शनास आले. यातील एक मोठी जलवाहिनी असून दुसरी कॉलनी भागातील आहे. हे काम अत्यंत जुने असल्याने खड्डा नेमका कशामुळे पडला, याचे कारण समोर आले नाही. हा प्रकार महापालिकेच्या पदाधिकाऱ्यांना समजताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली.

सुरक्षेचा उपाय म्हणून पालिका प्रशासनाने तात्काळ दुभाजक टाकत संबंधित मार्गावरील वाहतूक बंद केली आहे. याविषयी नगरसेवक ॲड. शाम बडदे यांनी, खड्डा पडलेल्या ठिकाणी चेंबर असल्याचे सांगितले. पाणी गळतीमुळे तेथील भाग पोकळ झाला आहे. त्यामुळे खड्डा पडला. महापालिका आयुक्त खत्री यांना या विषयी माहिती दिली असता तातडीने त्या ठिकाणी काम सुरू झाल्याचे त्यांनी सांगितले.

बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

मालेगांव अंचल कार्यालय
बी.एस.एन.एल. संचार सदन, सटाणा नाक्याजवळ मालेगाव 423203
प्रधान कार्यालय: लोकमंगल 1501, शिवाजीनगर, पुणे - 411005.

स्थावर मालमत्ताच्या विक्री करिता विक्री सूचना

दि सेक्यूरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट्स ॲक्ट 2002 आणि त्यासह वाचण्याच्या सेक्युरिटी इंटरेस्ट्स (एन्फ़ार्समेंट) रुल्स 2002 मधील रुल 8(6) च्या अटींनुसार स्थावर मालमत्ताच्या विक्री करिता ई- ऑक्शन विक्री सूचना

या ठिकाणी सर्व साधारण जनतेस आणि विशेष करुन कर्जदार आणि जामिनदाराना सूचना देण्यात येते की , खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्ता , ज्या सुरक्षित धनको (सिक्युर्ड क्रेडिटर) बैंक ऑफ महाराष्ट्र यांच्या कड़े गहाण / बोज्या अंतर्गत आहेत आणि बैंक ऑफ महाराष्ट्रचे अधिकृत अधिकारी यानी सदर मालमत्तांचा **प्रत्यक्ष/ सांकेतिक ताबा** घेतला असून, सदर मालमत्तांची विक्री **दि. 28/09/2026 रोजी 01.00 ते 05.00 दरम्यान "जसे आहे जेथे आहे ",जे आहे जसे आहे,"तेथे जे आहे"** , या तत्वावर बैंक ऑफ महाराष्ट्र यांना खाली नमूद केलेल्या परिशिष्टामधील कर्जदार व जामीनदार यांच्या कडून येणे असलेली रक्कम वसूल करण्यासाठी ई - ऑक्शनद्वारे केली जाणार आहे कर्जदार आणि जामिनदारांकडून येणे असलेल्या रकमेचा तपशील, स्थावर मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन आणि त्यावरील माहिती असलेला बोज़ा, ताब्याचा प्रकार,राखीव किमत, बयाणा रक्कम पुढील प्रमाणे आहे.

अनु. क्र.	कर्जदाराचे / जामीनदारांचे नाव	येणे रक्कम	स्थावर मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन आणि माहीत असलेला बोज़ा	राखीव किमत / बयाणा रक्कम / बोली वाढविण्याची रक्कम (सर्व तीन कर्जदार खात्यांची एकत्रित रक्कम)
1.	**मेसर्स पी. स्क्वेअर क्रिएशन्स त्यांच्या द्वारे भागीदार 1. श्री.हेमंत प्रभाकर पाटील 2. श्री.भारत विश्वासराव पाटील 3. श्री जयंतीलाल देवाशी पटेल 4. श्री. हसमुख देवाशी पटेल शाखा - मालेगाव (नाशिक)**	**रु. 80,88,358/-** 02/04/2025 च्या मागणी सुचनेनुसार, अधिक लागु न झालेले व्याज, वसुलीच्या तारखेपर्यंत इतर कायदेशिर खर्च/ शुल्क **रु. 33,27,277/-** 01/08/2026 पर्यंत अधिक लागु न झालेले व्याज, कायदेशिर आणि इतर खर्च/ शुल्क	नोंदणीकृत गहाण असलेले संपत्तीचा संपूर्ण भाग आणि तुकडा असलेले **प्लॉट नं. 7,** क्षेत्रफळ 504.00 चौ.मी. आणि प्लॉट नं. 8, क्षेत्रफळ एरीया 504 चौ.मी. आणि प्लॉट नं. 16, क्षेत्रफळ एरीया 514.03 चौ.मी. ज्यापैकी असलेले जी.नं. 1542/2ए/1+1542/2बी आणि त्यावरील बांधकामासह दाभाडी, मालेगाव. **प्लॉट नं. 16 ची चतुर्सिमा : पूर्व** - अतिरिक्त एस नं., **पश्चिम** - 15 मीटर रोड, **उत्तर** - प्लॉट नं. 15, **दक्षिण** - प्लॉट नं. 17. **प्लॉट नं. 7 + 8 ची चतुर्सिमा : पूर्व** - रोड, **पश्चिम** - रोड, **उत्तर** - खुली जागा, **दक्षिण** - सुविधा प्लॉट नं. 18. **ताब्याचा प्रकार : सांकेतिक ताबा.**	**रु. 1,18,66,000/-** (रुपये एक कोटी अठरा लाख सहासष्ट हजार फक्त) **रु. 11,86,600/-** (रुपये अकरा लाख शहाऐंशी हजार सहाशे फक्त) **रु. 50,000/-** (रुपये पन्नास हजार फक्त)
2.	**श्री मोहम्मद हनफ अब्दुल रज्जाक जमानतदार : श्री आदिल मोहम्मद अन्वर शाखा - मालेगाव (नाशिक)**	**रु. 14,53,601/-** 23/01/2025 च्या मागणी सुचनेनुसार, अधिक लागु न झालेले व्याज, वसुलीच्या तारखेपर्यंत इतर कायदेशिर खर्च/ शुल्क	**संपत्तीचे मालक : श्री मोहम्मद हनीफ अब्दुल रज्जाक** नोंदणीकृत गहाण असलेले जमिनीचा संपूर्ण भाग आणि तुकडा असलेले **प्लॉट नं. 20,** क्षेत्रफळ एरीया 114.44 चौ.मी., सर्व्हे नं. 50/51, स्थित पोस्ट दरेगाव,ब्लू वॉटर पार्क जवळ, मालेगाव, जिल्हा नाशिक. **चतुर्सिमा : पूर्व** - 98 मी. रोड, **पश्चिम** - मोकळी जमीन **उत्तर** - प्लॉट नं. 9, **दक्षिण** - प्लॉट नं. 21. CERSAI ID: Security ID: 400052628900 | Assets ID: 200052624198 **ताब्याचा प्रकार : सांकेतिक ताबा.**	**रु. 25,60,000/-** (रुपये पंचवीस लाख साठ हजार फक्त) **रु. 2,56,000/-** (रुपये दोन लाख छप्पन्न हजार फक्त) **रु. 20,000/-** (रुपये वीस हजार फक्त)
3.	**मेसर्स जोगेश्वरी फर्टिलायझर्स अजंग त्यांच्या द्वारा प्रोप्रायटर संजय रघुनाथ जाधव जमानतदार : 1. श्री. मनोहर तुकाराम अमृतकर 2. श्री. उद्धव आत्माराम महाले शाखा : अजंग वडेल**	**रु. 22,08,240/-** 16/12/2019 च्या मागणी सुचनेनुसार, अधिक लागु न झालेले व्याज, वसुलीच्या तारखेपर्यंत इतर कायदेशिर खर्च/ शुल्क	**ग्रामपंचायत मिळकत नं. 557,** क्षेत्रफळ एरीया 1400 चौ.फुट मौजा अजंग, तालुका मालेगाव जिल्हा नाशिक. **ताब्याचा प्रकार : सांकेतिक ताबा.**	**रु. 22,80,000/-** (रुपये बावीस लाख ऐंशी हजार फक्त) **रु. 2,28,000/-** (रुपये दोन लाख अठ्ठावीस हजार फक्त) **रु. 20,000/-** (रुपये वीस हजार फक्त)
4.	**श्री बळीराम रामदास कलवार जमानतदार : 1. श्री. दिनेश सुभाष सांगळे 2. श्री योगेश अशोक सांगळे शाखा - मनमाड**	**रु. 9,53,566/-** 21/01/2023 च्या मागणी सुचनेनुसार, अधिक लागु न झालेले व्याज, वसुलीच्या तारखेपर्यंत इतर कायदेशिर खर्च/ शुल्क	**संपत्तीचे मालक : श्री. बळीराम रामदास कलवार** नोंदणीकृत गहाण असलेली संपत्तीचा संपूर्ण भाग आणि तुकडा असलेले संपत्ती समावेश रो हाऊस नं. 07, क्षेत्रफळ 48 चौ.मी. बिल्टअप क्षेत्रफळ एरीया 515 चौ.फुट "साई रेसिडेंन्सी" नावानी परिचीत प्लॉट नं. 8 वरील बांधकामासह स्थित सर्व्हे नं. 142/ए1/ए5, कॅम्प एरीया मनमाड जवळ, क्षेत्रफळ 65.50 चौ.मी. पोस्ट मनमाड, तालुका नांदगाव, जिल्हा नाशिक. **चतुर्सिमा : (पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण) : पूर्व** - रो हाऊस नं. 06, **पश्चिम** - रो हाऊस नं. 08, **उत्तर** - रोड, **दक्षिण** - प्लॉट नं. 7 आणि 8. **ताब्याचा प्रकार : प्रत्यक्ष ताबा.**	**रु. 9,80,000/-** (रुपये नऊ लाख ऐंशी हजार फक्त) **रु. 98,000/-** (रुपये अठ्ठ्याण्णव हजार फक्त) **रु. 20,000/-** (रुपये वीस हजार फक्त)
5.	**मेसर्स माऊली ट्रेडर्स त्यांच्या द्वारा श्री रमेश मुरलीधर अहिरे जमानतदार : श्री.हरिदास मुरलीधर अहिरे शाखा - मालेगाव (नाशिक)**	**रु. 14,51,098/-** 04/03/2025 च्या मागणी सुचनेनुसार, अधिक लागु न झालेले व्याज, वसुलीच्या तारखेपर्यंत इतर कायदेशिर खर्च/ शुल्क	**नोंदणीकृत गहाण असलेले संपत्तीचे मालक श्री. रमेश मुरलीधर अहिरे आणि श्री. हरिदास मुरलीधर अहिरे** जमिनीचा संपूर्ण भाग आणि तुकडा असलेले सी.टी.एस. नं. 17, क्षेत्रफळ एरीया 73.60 चौ.मी. स्थित बालगंधर्व मंगल कार्यालयाच्या मागे, भायगाव जामा रोड, मालेगाव कॅम्प नाशिक, जिल्हा नाशिक, पिन-423203. **चतुर्सिमा : पूर्व** - रोड, **पश्चिम** - रोड **उत्तर** - सीटीएस नं. 18, **दक्षिण** - सीटीएस नं. 16. मालमत्तेतील सर्व हक्क मालकी हक्क आणि त्यावर बांधण्यात येणाऱ्या किंवा बांधण्यात येणाऱ्या बांधकामासह. **ताब्याचा प्रकार : सांकेतिक ताबा.**	**रु. 28,67,000/-** (रुपये अठ्ठावीस लाख सदुसष्ट हजार फक्त) **रु. 2,86,700/-** (रुपये दोन लाख शहाऐंशी हजार सातशे फक्त) **रु. 20,000/-** (रुपये वीस हजार फक्त)
6.	**मेसर्स ए. के. ट्रेडर्स त्यांच्या द्वारा प्रोप्रायटर : श्री. रईस अहमद मोहम्मद आरिफ जमानतदार : श्री. मोहम्मद शहजाद मोहम्मद आरिफ (शाखा : मालेगाव (नाशिक)**	**रु. 3,07,85,732/-** 06/01/2026 च्या मागणी सुचनेनुसार, अधिक लागु न झालेले व्याज, वसुलीच्या तारखेपर्यंत इतर कायदेशिर खर्च/ शुल्क	**मालमत्ता धारकाचे नाव : श्री. रईस अहमद मोहम्मद आरिफ** नोंदणीकृत गहाण असलेले संपत्तीचा संपूर्ण भाग आणि तुकडा असलेले जमिन आणि बिल्डींग स्थित सीटीएस नं. 1394/3, इस्लामपुर येथे तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक, प्लॉटचा क्षेत्रफळ एरीया 122.68 चौ.मी. **चतुर्सिमा : पूर्व** : सीटीएस नं. 1394/3 भाग, **पश्चिम** : सीटीएस नं. 1394/2, **उत्तर** : रोड, **दक्षिण** : गल्ली. CERSAI ID : 07AAECC5770G1ZN | Asset ID: 200063158382 **ताब्याचा प्रकार : प्रत्यक्ष ताबा**	**रु. 1,06,21,000/-** (रुपये एक कोटी सहा लाख एकवीस हजार फक्त) **रु. 10,62,100/-** (रुपये दहा लाख बासष्ट हजार एकशफक्त) **रु. 50,000/-** (रुपये पन्नास हजार फक्त)

ई-लिलाव तारीख 28/09/2026, दुपारी 01.00 ते सायं. 05.00 वाजेपर्यंत

मालमत्तेच्या पहाणीची तारीख व वेळ : दिनांक 10/09/2026 ते 25/09/2026 रोजी सकाळी 11.00 ते सायंकाळी 05.00 दरम्यान.

बयाना रक्कम आणि प्रूफ सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ : दिनांक 27/09/2026 रोजी सायं 5.00 पर्यंत.

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्ती जाणून घेण्यासाठी कृपया बँके च्या वेबसाइट वरिल लिंक - https://bankofmaharashtra.bank.in तसेच पिएसबी अलायंस ई-बिक्रय https://baanknet.com/eauction-psb/x-login वर देखील प्रदान केले आहे किंवा यांच्याशी संपर्क साधवा **श्री. अनस अली, मोबाइल नं. 9718617198, श्री. चेतन कापडणीस, मोबाईल नं. 8956495433 आणि श्री. ज्ञानेश्वर घडाडे, मुख्य व्यवस्थापक, मोबाइल नं. 8459141304**

स्थान : मालेगाव
दिनाक : 09/09/2026

अधिकृत अधिकारी / मुख्य व्यवस्थापक
बँक ऑफ महाराष्ट्र मालेगाव झोन

(सदर नोटीस ही मूळ इंग्रजी नोटिसचे भाषांतर असून, अर्थाच्या सोयीकरीता इंग्रजी भाषेतील नोटीस ग्राह्य धरली जाईल)

संलग्न जिल्ह्यांशी समन्वय गरजेचा

कुंभमेळा पूर्वतयारी बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांना सूचना

नाशिक : पुढील वर्षी नाशिक त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यातील वाहतूक, आरोग्य, स्वच्छता, आपत्ती व्यवस्थापन यांच्या नियोजनासाठी नाशिकसह संलग्न जिल्ह्यांचाही सहभाग महत्त्वाचा असल्याने नाशिक विभागीय आयुक्त कार्यालयात सिंहस्थ कुंभमेळा पूर्वतयारीच्या अनुषंगाने नाशिक विभाग आणि संलग्न जिल्ह्यातील प्रशासकीय अधिकाऱ्यांबरोबर बैठक झाली. या बैठकीचे वैशिष्ट्ये जवळच्या गुजरात राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांनाही सूचना देण्यात आल्या. कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी बैठकीस मार्गदर्शन केले.

गुजरातमधील जिल्हाधिकाऱ्यांचा सहभाग

पुणे, पालघर, ठाणे, छत्रपती संभाजीनगर तसेच गुजरातमधील डांग आणि वलसाड जिल्ह्यातील प्रशासकीय अधिकाऱ्यांबरोबर ही बैठक झाली. कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, डांगचे जिल्हाधिकारी एन.डी. परमार, अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, नाशिक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, नाशिक महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अमित रंजन यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते. धुळे, जळगाव, नंदुरबारसह गुजरातमधील वलसाड येथील जिल्हाधिकारी तसेच पुणे आणि भुसावळ येथील रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक हे दूरदृष्ट्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

नाशिककडे येणाऱ्या धुळे, पालघर, मुंबई, छत्रपती संभाजीनगर, पुणे आदी मार्गावरून येणाऱ्या भाविकांना कोणताही त्रास होऊ नये, त्यांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागू नये, यासाठी नाशिक संलग्न असलेल्या जिल्हा प्रशासनाची महत्त्वाची भूमिका आहे. नाशिक जिल्हा प्रशासन आणि कुंभमेळा प्राधिकरणासोबत समन्वय राखून नाशिकमध्ये येणारी भाविकांची गर्दी त्या त्या जिल्ह्याच्या ठिकाणी रोखणे, त्यांना आवश्यक सुविधा त्यासाठी उपलब्ध असतील याची व्यवस्था करणे महत्वाचे असल्याचे डॉ. गेडाम यांनी सांगितले. ज्याठिकाणी भाविकांना थांबविले जाईल त्याठिकाणी खाद्यपदार्थ, पिण्याच्या पाण्याची तसेच स्वच्छतागृहाची व्यवस्था तसेच आरोग्य विषयक काही सुविधा असणे अपेक्षित आहे. नाशिक शहरातील भाविकांची गर्दी कमी झाली की तसे हे भाविक नाशिकच्या दिशेने सोडण्याचे नियोजन तेथील स्थानिक प्रशासनाने करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

भरती परीक्षा सुधारणांसाठी सूचना पाठवा !

नाशिक : राज्यातील भरती परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्यासाठी जिल्ह्यातील विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा परीक्षार्थी, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था, कोचिंग क्लासेस, अभ्यासिका चालक, लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून सूचना व अभिप्राय मागविले आहेत. संबंधितांनी १० ते १६ सप्टेंबर या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी सहा या वेळेत सूचना, अभिप्राय द्यावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी केले आहे. परीक्षा पद्धतीतील सुधारणा, पारदर्शकता, प्रश्नपत्रिका सुरक्षितता, माहिती तंत्रज्ञानाचा वापर, गैरप्रकारांना प्रतिबंध, उत्कृष्ट कार्यपद्धतींचा अवलंब, यांसारख्या विषयांवर सूचना व अभिप्राय सादर करता येतील. लेखी अथवा ऑनलाइन अभिप्रायासाठी नाशिक डॉट जीओव्ही डॉट इन या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या लिंकचा वापर करावा.